दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.२९ ऑक्टोबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ६९ | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 29 Oct 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 69 | Pages 4 | Rate 4 Rs

काचेच्या घरात राहत नाही, दगड फेकू नका

मुंबई–भाजपने घेतलेल्या या जागेवर काही लोकांनी प्रश्नचिन्ह उभे केलेले आहे. त्यांना मी सांगतो की भारतीय जनता पार्टी काचेच्या घरात राहत नाही. हमारे उपर पत्थर फेकने का प्रयास मत करो, असा इशारा देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना दिला. आपण ज्यावेळेसे कार्यालयासाठी जागा घेऊ, काही नतद्रष्ट लोक बसलेलेच आहेत. रोज ते प्रश्न विचारतील. त्यामुळे मी पहिल्या दिवशी मनोज सांगितले की, सरकारी जागा नको. जी जागा असेल, ती विकत घेऊ. विकत घेताना महानगरपालिकेचे सगळे नियम आपण पाळू. आपल्याला एकाही नियमात सूट नको, एकही शॉर्टकट नको. सगळ्या गोष्टी पूर्ण नियमाने करूयात. एखाद्या सामान्य माणसाने, एखाद्या बिल्डरने प्लॉट घेतला, तर त्याला जे जे करावे लागेल, ते सगळे भाजप या ठिकाणी करेल, असे देवेंद्र फडणवीसांनी सांगितले.

आगामी निवडणुका महायुतीत लढण्याची भूमिका ठेवा

शेवटचा पर्याय म्हणून मैत्रीपूर्ण लढत

एकनाथ शिंदेंचे आपल्या मंत्र्यांना आदेश

दैनिक वादळ वार्ता
मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात आगामी काळात होणाऱ्या महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षाच्या मंत्र्यांची एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीमध्येच लढवण्याचे स्पष्ट आदेश दिलेत. तसेच जिथे जुळून येत नसेल, तिथे शेवटचा पर्याय म्हणून मैत्रीपूर्ण लढण्याचेही आदेश शिंदेंनी मंत्र्यांना दिलेत.एकनाथ शिंदे यांच्या 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी ही बैठक पार पडली. या बैठकीला संजय शिरसाट, प्रताप सरनाईक, उदय सामंत, शंभूराज देसाई, भरत गोगावले, योगेश कदम, गुलाबराव पाटील, प्रकाश अबिटकर यांसारखे महत्त्वाचे मंत्री उपस्थित होते. या बैठकीत एकनाथ शिंदे यांनी मंत्र्यांचे प्रगती पुस्तक देखील तपासले.एकनाथ शिंदे यांनी सर्व मंत्र्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुतीतच लढायच्या ही भूमिका ठेवण्याचे आदेश दिले. शिंदे म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका, ज्यात महानगरपालिका देखील आहेत, त्या सर्व ठिकाणी आपल्याला महायुतीमध्येच लढायच्या आहेत. सर्वत्र महायुती म्हणून निवडणूक लढवण्याची तयारी ठेवावी. अगदीच जिथे काही जुळून येत नसेल, तिथे शेवटचा पर्याय म्हणून मैत्रीपूर्ण लढत करण्याचा विचार करता येईल, अन्यथा महायुती म्हणून एकत्र लढण्यावरच भर असेल.दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी आजच्या बोलावलेल्या या बैठकीचा उद्देश केवळ निवडणुकीच्या रणनीतीवर चर्चा करणे नव्हता, तर मंत्र्यांनी त्यांच्या जबाबदारीचे किती पालन केले, हे तपासणे हा होता. एकनाथ शिंदे यांनी गेल्या महिन्यात सर्व मंत्र्यांशी 'वन टू वन' चर्चा करून त्यांना विशिष्ट मतदारसंघांची जबाबदारी दिली होती. आजच्या या बैठकीत शिंदे यांनी प्रत्येक मंत्र्याला दिलेल्या जबाबदारीचा आढावा घेतला. मंत्री दिलेल्या मतदारसंघात किती फिरले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची किती तयारी केली, आणि पक्ष संघटनेसाठी काय काम केले याची माहिती घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीपूर्वी एकनाथ शिंदे यांनी नुकताच नवी दिल्लीचा दौरा करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली होती. याच दौऱ्यादरम्यान, मुंबई महापालिका निवडणुकीत शिंदे यांची शिवसेना समसमान जागा लढवण्यासाठी आग्रही असल्याची चर्चा होती.आता एकनाथ शिंदे यांनी महायुतीत एकत्र लढण्याचा स्पष्ट संदेश दिल्यानंतर, मुंबई महापालिकेच्या २२७ जागांपैकी महायुतीमध्ये कोणाला किती जागा मिळतात आणि महायुतीचा भगवा फडकवण्यासाठी शिंदे यांची शिवसेना किती जागांवर लढणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

हिंगोलीतील फुले-शाहू-आंबेडकरवाद्यांच्या शिलेदारांची

जमलेली गर्दी ही वंचित बहुजन आघाडीच्या विजयाचा निर्धार आहे

दैनिक वादळ वार्ता
हिंगोली । प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी स्थानिक प्रश्नांना प्राधान्य देत शेतकरी, कष्टकरी आणि युवक यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढत आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान असो वा रोजगाराचा प्रश्न असो यासाठी लढताना वंचित बहुजन आघाडीच जनतेसोबत उभी दिसते.हा विश्वास आता महाराष्ट्रातील जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. कारण सत्ताधारी मग ते भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी शरद पवार असोत त्यांनी आतापर्यंत फक्त स्वतःचे खिसे भरून पैसे कसे कमवता येतील यासाठीच सत्तेचा वापर केला आहे.जनतेने वंचित बहुजन आघाडीला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एक संधी द्यावी. ही संधी मिळाल्यास जिल्हा परिषदेच्या माध्यमातून महिन्याला पाच हजार आणि नगरपालिकांच्या माध्यमातून महिन्याला दोन हजार रोजगार निर्माण करून देऊ.आगामी निवडणूक ही कार्यकर्त्यांची आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने स्थानिक प्रश्न सोडवण्यासाठी गावागावात, शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून वंचित बहुजन आघाडीची ध्येय-धोरणे लोकांपर्यंत पोहचवायची आहेत.फुले-शाहू-आंबेडकरवाद्यांची ही जमलेली गर्दी महाराष्ट्राला सांगत आहे की विजय हा आपलाच आहे.

विघ्नहर्ता मित्र मंडळातील सदस्यांचा कौतुकास्पद संकल्प!

व्यर्थ खर्च न करता वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा करणार

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

शहरातील विघ्नहर्ता मित्र मंडळातील सर्वच सदस्यांनी एक कौतुकास्पद संकल्प केला आहे. वाढदिवसाला व्यर्थ खर्च न करता जमा केलेले पैसे अनाथ आश्रम, गरजवंत विद्यार्थी किंवा गोशाळेला देऊन वाढदिवस साजरा करण्याचा संकल्प मंडळाच्या सर्वच सदस्यांनी केला आहे. यामुळे मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे. शहरातील विघ्नहर्ता मित्र मंडळ हे नेहमीच चर्चेत असते. गणरायाचा आगमन सोहळा असो कि विसर्जन मिरवणूक ही शहरातील सर्वच मंडळांपेक्षा हटके असते. यामुळे 'बीडकर' देखील मिरवणूक असो कि विसर्जन बघण्यास उत्सुक असतात. तसेच मंडळाच्या वतीने मागील अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातात. यावर्षी तर मंडळाने एक कौतुकास्पद उपक्रम हाती घेतला आहे. वाढदिवसाला व्यर्थ खर्च न करता तो खर्च अनाथ आश्रम, विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, गोशाळेला चारा वाटप करून साजरा करण्याचा संकल्प सर्व सदस्यांचा वतीने करण्यात आला आहे. अशी माहिती विघ्नहर्ता मित्र मंडळाचे अध्यक्ष शुभम जोशी आणि मंडळातील सदस्यांनी दिली. यामुळे व्यर्थ खर्च न होता सामाजिक बांधिलकी जोपसली जाणार आहे. या उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

खा.सोनवणे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परळी तालुक्याची गुरुवारी आढावा बैठक

सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे-तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील

दैनिक वादळ वार्ता
परळी वै । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार साहेबांच्या याची परळी तालुक्यातील जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगर परिषद या निवडणुकीच्या संदर्भात बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली सोमवार दिनांक ३० ऑक्टोंबर रोजी दुपारी १.००, वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ रेस्ट हाऊस येथे आढावा बैठक संपन्न होणार आहे. या बैठकीला परळी तालुक्यातील सर्व प्रमुख नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत. तरी सर्व तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या वतीने सर्व प्रमुख कार्यकर्त्यांनी या आढावा बैठकीस उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाच्या परळी तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील,अँड. जीवनराव देशमुख यांनी केले आहे.बीड जिल्ह्याचे दबंग खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या मुख्य मार्गदर्शनाखाली होत असलेल्या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के पाटील, महबूब शेख युवक महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सतीशराव शिंदे युवक जिल्हाध्यक्ष बीड केज विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार पृथ्वीराज उर्फ रोमन साठे, ज्येष्ठ नेते राजेसाहेब देशमुख, डॉ. नरेंद्र काळे, युवा नेते राजेभाऊ फड, ज्येष्ठ नेते फुलचंद कराड, ज्येष्ठ नेते प्रभाकर वाघमोडे, ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख, अदी मान्यवर नेते उपस्थित राहणार आहेत.

या आढावा बैठकीत जिल्हा परिषद व पंचायत समिती नगरपरिषद निवडणुकी संदर्भात आढावा घेतला जाणारा असून मान्यवर नेत्यांचे मार्गदर्शन असणार आहे. या आढावा बैठकीस परळी तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सर्व पदाधिकारी, आजी -माजी ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे परळी तालुका अध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील शहराध्यक्ष अँड. जीवनराव देशमुख यांनी केले आहे.

अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान व मानसिक तणावामुळे शेतकऱ्याची आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
औसा । खालेद काझी

तालुक्यातील नागरसोगा परिसरातील एका शेतकऱ्याने अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीसह वैयक्तिक अडचणींमुळे मानसिक तणावाखाली आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, बिभीषण पंढरीनाथ साळुंके (वय ३३) हे गेल्या काही वर्षांपासून आपल्या कुटुंबासह नागरसोगा येथे वास्तव्यास होते. त्यांच्या नावावर शेती असून, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. त्यातच काही वैयक्तिक कारणांमुळे ते तणावाखाली होते.रविवारी रात्री त्यांनी स्वतःच्या घरात पेट्रोल ओतून आत्मदहन केल्याची घटना उघडकीस आली. तत्काळ त्यांना उपचारासाठी लातूर येथे हलविण्यात आले; मात्र, सोमवारी पहाटे त्यांचा मृत्यू झाला.बिभीषण साळुंके यांच्या पश्चात वृद्ध आई, पत्नी व दोन बहिणी असा परिवार आहे. शेतीवरील कर्ज व अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीने ते त्रस्त होते, अशी प्राथमिक माहिती नातेवाइकांनी दिली आहे.

ॲड.प्रकाश कवठेकर यांचा समाजभूषण पुरस्काराने गौरव

दैनिक वादळ वार्ता
पाटोदा । प्रतिनिधी

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन आणि माजी जिल्हा परिषद सदस्य ड.प्रकाश कवठेकर यांना 'माता सावित्री-फातिमा समाजभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योजकतेच्या क्षेत्रात त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार देण्यात आला. मुंबईत १९ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या समारंभात आ.मंगेश कुडाळकर आणि इतर मान्यवरांच्या हस्ते त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी उपस्थितांनी त्यांच्या समाजसेवा, शिक्षण, डिजिटल उपक्रम आणि युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणाऱ्या ड.प्रकाश कवठेकर यांना 'माता सावित्री फातिमा समाजभूषण'प्रदान करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले. तेजस ग्रुपच्या माध्यमातून ड.कवठेकर यांनी तेजस डिजिटल मार्केटिंग, तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स, तेजस अर्बन कॉपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस अर्बन मल्टिनिधी, ऑक्सितेज मिनरल वॉटर, राजनंदनी अर्थमूव्हर्स, तेजस इंडस्ट्रीज अशा विविध संस्थांद्वारे शेकडो युवकांना दिशा आणि रोजगार दिला. ड.प्रकाश कवठेकर हे अनेक वर्षांपासून सामाजिक चळवळीत सक्रिय सहभागी आहेत. याच बरोबर त्यांनी राजकारणात आपण दबदबा निर्माण करताना अनेक व्यवसाय उभा करून बेरोजगारांच्या हाताला काम देऊन शेकडो चुली पेटविण्याचे काम दखील केलेले आहे. विविध संस्थांच्या माध्यमातून त्यांनी मोठे नेटवर्क उभा केलेले असून सामाजिक कार्यही त्यांनी जपलेले आहे. अतिवृष्टी आणि दुष्काळाच्या काळात त्यांनी विविध उपक्रम राबवून गरजवंतांना मतदीचा हात देण्याचे कामही केलेले आहे. याच कारणाने त्यांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे. या पुरस्कारामुळे त्यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे. या कार्यक्रमास माता सावित्री फातिमा सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष कादर सय्यद सर एफ एम खान डॉक्टर सलीम जावेद वाहक सुनील पाटील सर, तांदळे अभिजित सर,रतन बहिर सर, फसले सर,राहुल शिंदे, गोरख बेद्रे सचिन बेद्रे, दाऊद पठाण आदी

संपादकीय

'मालवणी'ला प्रतिष्ठा देणारा नाटककार

मालवणी नाटकांचा पाया रचणारे आणि या भाषेला जागतिक मंच देणारे ज्येष्ठ नाटककार गंगाराम गवाणकर यांचे निधन झाले. नाटकाने मराठी रंगभूमीवर मालवणी भाषेची प्रतिष्ठा वाढवली आणि मच्छिंद्र कांबळी यांच्यासारखा मालवणी नटसम्राट घडवला. वस्त्रहरणचे तब्बल पाच हजारांहून अधिक प्रयोग झाले आणि या नाटकाचे प्रदर्शन दिल्लीतील नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाच्या 'भारत रंगमहोत्सव'मध्येही झाले. त्या काळातील अनेक गाजलेल्या किश्श्यांना साठवून ठेवणारे त्यांचे आत्मकथन 'व्हाया वस्त्रहरण' हे पुस्तक रसिकांच्या मनात आजही लोकप्रिय आहे. त्याचबरोबर 'ऐसपैस' हे त्यांचे आणखी एक उल्लेखनीय लेखन म्हणून ओळखले जाते. नानांच्या जाण्याने खऱ्या अर्थाने मालवणी माणूस 'पोरको झालो आसा. नानांचो हसत खेळत असणारो मालवणी संवाद मराठी माणसांक कायमच आठवत ऱ्हवात. आमच्या नानांका देवान् चिरनिद्रा देवची हीच भावपूर्ण आदरांजली.'काही व्यक्ती आपल्या घरातील नसतात किंवा नात्यातीलही नसतात; परंतु तरीही त्या मनोमन आपल्याच वाटतात. काहींच्या थेट ओळखीची असते, तर काहींना अशी व्यक्ती ओळखतही नाही; परंतु तरीही अशी व्यक्ती आपली वाटते. का कुणास ठाऊक, परंतु 'वस्त्रहरण' नाटकाचे लेखक गंगाराम गवाणकर यांच्या बाबतीतही कोकणात, मालवणी मुलखात अशीच भावना आहे. गंगाराम गवाणकर यांच्या निधनाची बातमी धडकली आणि मालवणी मुलखात आपल्याच घरचा माणूस गेल्याचे धस्स झाले आणि तेही साहजिकच आहे. 'वस्त्रहरण'सारख्या पूर्णपणे मालवणी भाषेचा बाज असलेल्या नाटकाने मालवणी मुलुख, इथली भाषा सातासमुद्रापार लंडन, अमेरिकेपर्यंत पोहोचवली. त्यामध्ये 'वस्त्रहरण'मधील तात्या सरपंच अर्थात अभिनेते स्व. मच्छिंद्र कांबळी यांचा मोठा वाटा आहे; परंतु 'वस्त्रहरण'चे लेखक गंगाराम गवाणकर यांच्या संहितेने वस्त्रहरण नाटकातील संवादाने त्याला चारचाँद लागले. माडबन, ता. राजापूर या खाडीकिनाऱ्याच्या निसर्ग सौंदर्याने नटलेल्या गावात गवाणकर यांचा जन्म झाला. माडबन गाव खऱ्या अर्थाने गंगाराम गवाणकर यांच्यामुळे अधिक चर्चेत आले. घरची गरिबी होती. त्यामुळे शालेय जीवनापासून सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांनी खरंतर कोणीही माणूस उमेद हरून जाईल, परंतु गवाणकर यांचं सारं आयुष्य कष्ट करण्यात गेले.पूर्वी आणि आजही गावात राहून काय खायचं हा प्रश्न असल्याने कोकणातील असंख्य तरुण त्या काळात आणि आजही शहराकडे धाव घेतात. त्याकाळी तर गावात राहून उदरनिर्वाहाचं काही साधन नव्हतं. कोकणातील जवळपास सर्वच घरातील परिस्थिती ही सारखीच होती. यामुळे मुंबई गाठण्याशिवाय पर्याय नव्हता. त्याप्रमाणेच माडबनच्या गंगाराम गवाणकरांनी मुंबई गाठली. जे जमेल, पडेल ते काम त्यांनी केले. मालवणी मुलखातला माणूस हा मुळातच नाटक वेडा आहे. गंगाराम गवाणकरांनी बॅकस्टेज आर्टिस्ट म्हणून काम केले. आयुष्यातील खडतर प्रवासाला सामोरे जाताना गवाणकर यांनी कधीही स्वत:ला सहन कराव्या लागलेल्या संकटांचा दिखावा केला नाही. सतत हसतमुख आणि प्रसन्नतेने मालवणी भाषेच्या या लेखकाने नेहमीच सर्वांचे स्वागत केले. 'वस्त्रहरण' नाटक सुरुवातीला चाललेच नाही. एव्हाना कोकणातील 'वस्त्रहरण'चा पहिला, दुसरा दौरा फ्लॉप गेला होता; परंतु लेखक गंगाराम गवाणकर, भद्रकालीचे सर्वेसर्वा अभिनेते मच्छिंद्र कांबळी आणि वस्त्रहरणमधील इब्लीस मास्तर दिग्दर्शक स्व. रमेश रणदिवे या सर्वांनीच वस्त्रहरण नाटक सुरुवातीला चालत नाही हे लक्षात येऊनही न डगमगता प्रयोग चालू ठेवले. 'वस्त्रहरण' नाटकाचा एक प्रयोग मुंबईत झाला. हा नाट्यप्रयोग पाहायला सुप्रसिद्ध साहित्यिक, नाटककार, अभिनेते, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे त्या प्रयोगाला आले होते. भाईंनी त्या नाट्यप्रयोगानंतर जे वक्तव्य केलं, त्या चार-दहा वाक्यांनी 'वस्त्रहरण' हाऊसफुल्ल होऊ लागले. 'वस्त्रहरण'मधील या आठवणी सांगताना गंगाराम गवाणकर नेहमी म्हणायचे 'भाईंनी वस्त्रहरण पाहिल्यानंतर आमचा वस्त्रहरण कधी थांबलाच नाय'. 'वस्त्रहरण' नाटक लंडन दौऱ्यासाठी गेलं. त्या दौऱ्यातील आठवणी आणि वस्त्रहरण नाटक लंडनला जाण्यापूर्वी कोकणातील इरसाल मालवणी माणसांच्या प्रतिक्रियाही फार गंमतीशीर होत्या.'या 'वस्त्रहरण'वाल्यांक एष्टीत्सून फिराक पैशे नाय आणि लंडनाक चालले हत. लंडनाक जावचा म्हणजे काय खावचा काम आसा काय? ह्येंका वाटता काय?'असा संवाद त्या काळी गंगाराम गवाणकर यांच्याही कानी पडला; परंतु गवाणकर यांनीही मालवण माणसाचा हा खवचटपणा तितक्याच सहजतेने घेतला. गवाणकर हे जसे लेखक होते. तसेच ते अभिनेतेही होते. लीलाधर कांबळी यांच्या मृत्यूपश्चात वस्त्रहरण नाटकात मास्तरची भूमिका दस्तुरखुद्द गंगाराम गवाणकर करायचे. गंगाराम गवाणकर यांचा मास्तरही प्रेक्षकांना तितकाच भावला होता. 'वस्त्रहरण' नाटक येण्यापूर्वी काही मालवणी लेखकांनी एकांकिका जरूर लिहिल्या. रमण माळवदे यांची 'वाघ इलो वाघ'सारखी एकांकिका त्याकाळी शाळा-महाविद्यालयात सादर व्हायची; परंतु 'वस्त्रहरण' नाटकाच्या आगमनाने मालवणी भाषेचा एक वेगळा प्रभाव जगभरातील मराठी मनावर कोरला गेला. तीस-चाळीस वर्षांपूर्वी मुंबईतील लोकलच्या प्रवासात मालवणी कोणी बोलत असेल, तर तो घाबरत बोलायचा. मराठी बोलणाऱ्यांना मालवणी भाषेतील संवाद फार रूचायचा नाही; परंतु जेव्हा 'वस्त्रहरण' फॉर्मात आले तेव्हापासून मराठी भाषेतील वेगळा बाज आणि सौंदर्य असलेल्या मालवणी भाषेला निश्चितच मानाचं पान मिळू लागलं. वस्त्रहरणचे लेखक गवाणकर आणि अभिनेते मच्छिंद्र कांबळी यांनी मालवणी बोलताना लाजण्याचे, कमी वाटण्याचे कारणच नाही, उलट मालवणी बोली अभिमानाने बोलावी असं वातावरण खऱ्या अर्थाने 'वस्त्रहरण'ने निर्माण केलं. राजधानी मुंबई असेल किंवा उपराजधानी नागपूर मालवणी बोलणारी व्यक्ती दिसली की वेगळाच आपलेपणा वाटतो. गवाणकर यांनी जसं 'वस्त्रहरण' नाटक लिहिलं. तसंच 'वात्रट मेले' हे नाटकही त्यांनी लिहिलं. 'वात्रट मेले' या नाटकाचेही दोन हजारांवर प्रयोग झाले.गवाणकर यांच्यामधला सरळ, साधा आणि तितकाच दिलखुलास लेखक, मालवणी मनाचा माणूस आज आपल्यात नाही. कोकणातील विशेषकरून मालवणी मुलखातीत कोणत्याही कार्यक्रमाला, 'नाना तुम्ही या कार्यक्रमाक कायव करून येवक व्हया', असा आग्रह कोणत्या मालवणी माणसाने केला तर नानांनी कधीही 'नाही' म्हटलं नाही.तो कार्यक्रम लहान आहे की मोठा याचा विचार न करता गवाणकर कार्यक्रमाला पोहोचायचे. मालवणीत वस्त्रहरण नाटकाच्या निमित्ताने असलेल्या आठवणींची शिदोरी उपस्थितांसमोर मांडायचे आणि त्यांच्या मालवणी बोलीने उपस्थित असणारे सारेच खळाळून हसत दाद द्यायचे. विजयदुर्ग किल्ल्यावर उभं राहिल्यावर माडबन गाव दिसतं. माडा, पोफळीच्या बागायतीत माडबन गाव खुणावत असतं. विजयदुर्ग खाडीच्या पलीकडे माडबन गाव आहे. माडबन गावची खऱ्या अर्थाने ओळख गंगाराम गवाणकर उर्फ नानांमुळे झाली आहे. गवाणकरांच्या जाण्याने मालवणी मुलखाचे, मालवणी भाषेचे मोठे नुकसान झाले.

खाजगी साखर कारखानदारीमुळे सहकारी साखर कारखानदारी अडचणीत-आ.प्रकाशदादा सोळंके

दैनिक वादळ वार्ता
माजलगाव । दर्शन डोंगरे

गेल्या काही दिवसांत सहकारी साखर कारखानदारी अत्यंत अचणीतून जात असून,त्यात मोठ्या भांडवलदारांची खाजगी क्षेत्रात साखर कारखानदारी चालु केल्याने सहकारी क्षेत्रातील कारखानदारीला या खाजगी कारखानदारीशी स्पर्धा करत वाटचाल करावी लागत असल्याचे प्रतिपादन व्यक्त करत आपल्या कारखान्यातील कर्मचान्यांना १०% पगारवाढ केली असुन,ही पगारवाढ तात्काळ लागू केली जाईल.अशी महत्वपूर्ण घोषणा साखर संघाचे उपाध्यक्ष तथा कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांनी करताच कर्मचाऱ्यांनी घोषणेचे टाळयांच्या कडकडात स्वागत केले.

तेलगाव येथील लोकनेते सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५-२६ चा ३४ वा उस गाळीत हंगाम शुभारंभाचे निमित्ताने गव्हाण पुजननाचा कार्यक्रम दि. २८ ऑक्टोंबर मंगळवारी श्रीक्षेत्र नारायणगड संस्थानचे ह.भ.प.गुरुवर्य महंत श्री शिवाजी महाराजां यांच्या शुभहस्ते व साखर संघाचे उपाध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत गव्हाण पुजन करून व गव्हाणीत उसाची मोळी टाकून करण्यात आला. या कार्यक्रमास कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके चेअरमन विरेंद्र दादा सोळंके, व्हाईस चेअरमन जयसिंह भैया सोळंके आदिसह सर्व संचालकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ऊसाने भरलेल्या पहिल्या बैलगाड़ी, बैलाचे पूजन करून, गाडीवानाचा सत्कार केला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना आ.प्रकाश दादा सोळंके म्हणाले की, खाजगी साखर कारखानदारीत मोठया भांडवलदारांनी सहभाग घेत साखर उद्योग चालु केल्याने सहकार साखर उद्योगाला अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने सहकार उद्योगाची दमछाक होत असल्याची खंत व्यक्त केली. अशा परिस्थीतीत इतर कारखान्यांशी स्पर्धा करत आपल्या कारखान्याने गतवर्षी ४.२० लाख मे.टन उसाचे गाळप केले होते. यंदा पाऊसकाळ चांगला होवून धरणे भरल्याने तीन वर्षाचा उसाचा प्रश्न मिटला असल्याचे सांगत चालु गाळप हंगामात ६००० मे.टन उसाचे गाळप करून या हंगामातील १० लाख मे.टन गाळपाचे उद्दीष्ट पार करायचे असुन, हे उद्दिष्ट पार करण्यासाठी कारखान्याचे उसतोड मजुर, कारखाना कर्मचारी,कामगारांनी परिश्रम घेण्याचे आवाहन आ.सोळंकेंनी केले.पुढे बोलताना ते म्हणाले की ,माजलगाव धरण कायम भरलेले असावे यासाठी जायकवाडी ते माजलगाव धरण या १३२ किमी कॅनालचे काम पूर्ण केले. तसेच दुसरी महत्त्वाची लोणी, सांगवी योजनेच्या या दोन्ही योजनांवर शेकडो कोटीचा खर्च करून या दोन्ही योजना कार्यान्वित केल्या .यामुळे माजलगाव धरण १००% भरलेले राहणार असल्याने भविष्यात ऊसासाठी व इतर पिकासाठी पाण्याची चिंता राहणार नसल्याचे आ.सोळंके यांनी म्हटले.

साखर कारखाना कर्मचाऱ्यांना १०% पगारवाड

राज्यातील साखर कारखाना कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर विचार व चर्चा करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समिती व साखर कारखाना प्रतिनीधी यांच्यात झालेल्या यशस्वी चर्चेत त्रिस्तरीय करार करण्यात आला. या त्रिस्तरीय करारात साखर कारखाना कर्मचाऱ्यांच्या पगारात १०टक्के पगारवाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आल्याची घोषणा झाल्याचे आ.सोळंके यांनी सांगत लोकनेते सुंदररावजी सोळंके कारखान्याच्या कर्मचाऱ्यांना दि.०१ नोव्हेंबर २०२५ पासून ही नवीन पगारवाढ लागू करण्यात येईल.अशी घोषणा आ.प्रकाश दादांनी करताच टाळ्यांच्या कडकडाटात कर्मचाऱ्यांनी स्वागत केले.

दलित कुटुंबाचे गुरांसह तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण;आझाद क्रांती सेनेच्या वतीने उपोषण

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील गौरवाडी येथील दलित वस्तीतील रहिवासी रामा लक्ष्मण दुनघव यांनी आपल्या कुटुंबासह तसेच गुरं-जनावरां सहीत तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.त्यांच्यावस्तीला जाणारा पारंपरिक रस्ता अडवल्याने आणि पाण्याचा पुरवठा बंद केल्याने वस्तीतील सुमारे २०० नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.रामा दुनघव यांनी काही दिवसांपूर्वी तहसीलदार केज यांना निवेदन देऊन रस्ता मोकळा करून देण्याची मागणी केली होती.परंतु शासनाकडून त्याचा पाठ पुरावा झाला नाही त्यांनी प्रशासनाला दि.२८ ऑक्टोबर २०२५ रोजी उपोषणाचा इशारा दिला होता.मात्र प्रशासनाकडून कोणतीही दखल न घेतल्याने,आज त्यांनी अखेर आमरण उपोषणा ला सुरुवात केली.रामा दुनघव



यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की,माझे वडील लक्ष्मण वडजु दुनघव यांनी सर्वे नं. ११२/२ मधील काही जमीन विकत घेऊन तिथे आम्ही वस्ती केली.आज ही वस्ती साधारण २०० लोकसंख्येची असून, मुख्यत्वे दलित समाजा तील कुटुंबे येथे राहतात. वडीलोपार्जित रस्ता, पाणी व वीज यासारख्या मूलभूत सुविधा तयार केल्या आहेत.मात्र काही व्यक्तींनी राजकीय वैरातून आमचा रस्ता अडवला, पाईपलाइन फोडली आणि रस्त्यावर झाडे लावून वाहतुकीचा मार्गच बंद केला.अर्जदाराने आपल्या तक्रारीत नमूद केलेल्या व्यक्तींची नावेही दिली असून,हे सर्व लोक वारंवार आमच्यावर जातीवाचक शिवीगाळ, धमक्या आणि मारहाण करतात.तसेच पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही जाणूनबुजून बंद करण्यात आला आहे,असेही दुनघव यांनी सांगितले.त्यांनी पुढे म्हटले आहे की,तहसील प्रशासनाने तात्काळ चौकशी करून रस्ता वहीवाटीसाठी खुला करावा,पिण्याच्या पाण्याची व्यवस्था पुन्हा सुरू करावी आणि दोषींवर कठोर कारवाई करावी.या सर्व प्रकरणात आम्ही न्याय मागत असून जातीभेदाच्या कारणा वरून आमच्यावर अन्याय होत आहे.सदर घटनेमुळे गौरवाडी परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.दलित वस्तीतील नागरिकांनी सामाजिक न्याय मिळे पर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.ग्रामस्थांनी प्रशासनाने या प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन, गावातील सामाजिक सलोखा टिकवण्यासाठी न्याय तोडगा काढावा, अशी मागणी केली आहे.

वडवणी येथे डॉ.संपदा मुंडे प्रकरणी सर्व पक्षीय रास्ता रोको आंदोलन ; न्याय मिळेपर्यंत लढण्याचा निर्धार

दैनिक वादळ वार्ता
वडवणी । प्रतिनिधी

डॉ.संपदा मुंडे यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी बीड जिल्ह्यात संतापाची लाट उसळली असून आज वडवणीयेथे छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.पोटाच्या प्रश्नावर लढणारे आम्ही, पण आज न्यायासाठी रस्त्यावर उतरावे लागत आहे, अशा भावना व्यक्त करत आंदोलकांनी शासन व न्यायव्यवस्थेच्या भूमिके विरोधात संताप व्यक्त केला.०या आंदोलनात डॉ.संपदा मुंडे यांचे कुटुंबीय, नातेवाईक,स्थानिक नागरिक तसेच शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.या आंदोलना दरम्यान संपदाला न्याय मिळाल्याशिवाय माघार नाही, न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील अशा घोषणा देत वातावरण दणाणून गेले.

शेतकरी कामगार पक्षाचे राज्य सरचिटणीस भाई मोहन गुंड यांनी या आंदोलनाला प्रत्यक्ष उपस्थित राहून पाठिंबा दर्शविला.त्यांनी सांगितले की, राज्यकर्त्यांना न्याय व्यवस्थेकडे न्याय मागावा लागतो,हे आपल्या समाजाचे दुर्दैव आहे.डॉ. संपदा मुंडेच्या प्रकरणी न्याय मिळवण्यासाठी आम्ही रस्त्यावर आलो आहोत आणि न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरू राहील.यावेळी डॉ. संपदा मुंडे यांच्या कुटुंबीयांनीही भावनिक आवाहन करत म्हटले की, ही लढाई केवळ एका कुटुंबाची नाही,तर प्रत्येक अन्यायग्रस्त स्त्रीच्या न्यायाची लढाई आहे.

आंदोलनामुळे काही काळ वाहतुकीची कोंडी निर्माण झाली होती.पोलिसांनी घटनास्थळी येऊन आंदोलकांशी चर्चा करून रस्ता मोकळा करून दिला.तरीही नागरिक आणि सामाजिक संघटनांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत डॉ.संपदा मुंडे प्रकरणी निष्पक्ष चौकशी होऊन दोषींवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत न्यायासाठीचा संघर्ष अखंड सुरूच राहणार आहे.या आंदोलनाला शेतकरी कामगार पक्षाच्या चिटणीस मंडळानेही पाठिंबा दिला आहे असे शेकापचे राज्य सर चिटणीस भाई मोहन गुंड यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

अखेर काळजी शेतकरी पुत्रालाच ;कापूस खरेदी सुरू करण्याबाबत खा.सोनवणेंचे महाप्रबंधकांना पत्र,बीड जिल्ह्यात कापूस खरेदी सुरू करा

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

यावर्षी बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली.यामुळे शेतातील पिके मातीत मिसळली.यातून ही कापसासारखी पिके काही प्रमाणात हाती लागली आहेत,परंतु शासनाने अद्याप खरेदी केंद्रे सुरू केलेली नाहीत. यामुळे शेतकरी अडचणी सापडलेला असून शेतकऱ्यांच्या सोयीसाठी तातडीने कापूस केंद्र सुरू करावेत,असे पत्र खा. बजरंग सोनवणे यांनी कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया,छ.संभाजीनगरचे महाप्रबंधक यांना पाठविले आहे.एकूणच शेतकऱ्यांच्या विषयात खा.सोनवणे हे कायम पाठपुरावा करत आहेत.

कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया,छत्रपती संभाजी नगरचे महाप्रबंधक यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे,बीड जिल्हा हा प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यापैकी एक असून येथील अनेक तालुक्यां मध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड केलेली आहे. परंतु सीसीआयकडून बीड जिल्ह्यात खरेदी केंद्र आद्याप कार्यान्वितझालेले नसल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य दर मिळविण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.शेतकऱ्यांना दूरवर च्या केंद्रांवर कापूस विक्रीस नेण्यासाठी वाहतूक खर्च,प्रतीक्षा वेळ व तोलणीतील अडचणी यांचा त्रास सहन करावा लागत आहे.परिणामी, स्थानिक व्यापाऱ्यांकडे कमी दरात कापूस विकण्याची वेळ शेतकऱ्यांवर येत आहे. बीड जिल्ह्यातील कापूस खरेदी केंद्र सुरु करणे अत्यावश्यक आहे.त्यामुळे

शेतकऱ्यांना थेट किमान समर्थन मूल्यावर कापूस विक्रीची संधी उपलब्ध होईल.चालू हंगामासाठी बीड जिल्ह्यात सीसीआय खरेदी केंद्रे तातडीने सुरु करावीत,असे म्हटले आहे खा.बजरंग सोनवणे यांना राज्यभरात शेतकरीपुत्र म्हणून ओळखले जाते.ते कायम शेतकऱ्यांच्या विषयावर पोटतिडकीने संसदेत देखील प्रश्न मांडत असतात.जिल्ह्यातील शेतकरी जेव्हा जेव्हा अडचणीत असतात,तेंव्हा ते सर्वात अगोदर त्या ठिकाणी धावून जात असतात,असा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचा अनुभव आहे.जिल्ह्यात मागील महिन्यात अतिवृष्टी झाली.यामुळे शेतीचे आणि पिकांचेही अतोनात नुकसान झालेले आहे.अशा संकटात काही ठिकाणी अत्यल्प कापुस शेतकऱ्यांच्या हाती लागलेला असून आता त्याची विक्री करायची कुठे?असा प्रश्न शेतकऱ्यांपुढे आहे.यामुळे खा.बजरंग सोनवणे यांनी या विषयात लक्ष घालून खरेदी केंद्रे सुरूकरण्याची मागणी केली आहे.

इच्छुकांचे टेन्शन वाढलं, जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर? समोर आली मोठी अपडेट

दैनिक वादळ वार्ता

राज्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादी तयार करण्याची मुदत राज्य निवडणूक आयोगाने वाढवली आहे. सोमवारी जाहीर झालेल्या या निर्णयानंतर निवडणुका आणखी पुढे जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मूळ नियोजनानुसार २७ ऑक्टोबरपर्यंत मतदार यादी अंतिम करायची होती, मात्र आता ही प्रक्रिया १२ नोव्हेंबरपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यानुसार ३ नोव्हेंबरपर्यंत छापील मतदार याद्या अधिप्रमाणित केल्या जाणार असून, याच दिवशी संबंधित सूचना प्रसिद्ध केल्या जातील. तर १२ नोव्हेंबरला मतदान केंद्रांची यादी आणि मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

या मुदतवाढीमुळे निवडणुका पुढे ढकलल्या जाण्याची शक्यता बळावली आहे. आधीच नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुकांना प्राधान्य दिले जाणार असल्याच्या चर्चेमुळे ग्रामीण भागातील राजकीय कार्यकर्त्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

महापुरामुळे निवडणुकीला उशीर? दरम्यान, गेल्या महिन्यात मराठवाडा आणि विदर्भासह राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले होते. सध्या परतीचा पाऊस सुरू असल्याने शेतकरी वर्ग चिंतेत आहे. अनेकांना नुकसानभरपाईची रक्कम अजून मिळालेली नाही. त्यामुळे प्रशासकीय यंत्रणा पंचनामे आणि मदतकार्यांमध्ये गुंतलेली असल्याने, सध्या निवडणूक प्रक्रिया थोडी मागे ठेवण्यात आल्याचे संकेत मिळत आहेत. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका वर्षअखेर किंवा पुढील वर्षाच्या सुरुवातीस होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तळोदा काँग्रेस मेळाव्यात 'बूथ' स्तरावरून निवडणुकीचा एल्गार!

भाई नगराळे यांचा बूथ प्रमुखांना 'बाहेरचे मतदार हटवा' चा स्पष्ट संदेश; भाजपवर 'घुसखोरी'चा गंभीर आरोप

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

येत्या नगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने तळोदा येथे नुकताच एक महत्त्वाचा आणि तडफदार मेळावा घेतला. महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष भा.ई.नगराळे(आय.ए.एस. निवृत्त) यांच्यासह माजी मंत्री पद्माकर वळवी यांच्यासारखे दिग्गज नेते उपस्थित असलेल्या या मेळाव्यात, काँग्रेसने आतापासूनच 'बूथ' स्तरावर विजय निश्चित करण्यासाठी रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.

'बूथ प्रमुखांनी मतदार यादीवर लक्ष ठेवा': नगराळे.

मेळाव्यातील मुख्य भाषणात प्रदेश उपाध्यक्ष भाई नगराळे यांनी कार्यकर्त्यांना थेट आणि स्पष्ट निर्देश दिले. त्यांनी भाजपवर अत्यंत गंभीर आरोप करत म्हटले की, बाहेरून मतदार घुसविले जातात आणि त्यामुळेच भाजप आजपर्यंत निवडणुका जिंकत आलेला आहे.यावर उपाय सांगताना नगराळे यांनी सर्व बूथ प्रमुखांना महत्त्वाचा संदेश दिला: जर आपल्याला निवडणुका जिंकायच्या असतील, तर आता बूथ प्रमुखांनी मतदार यादीवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. जर आपण हेच बाहेरून घुसलेले मतदार बाजूला केले, तर स्थानिक मतदारांवर आपण निवडणुका नक्कीच जिंकू शकतो! निवडणुकीच्या तयारीचा पहिला टप्पा म्हणून त्यांनी मतदार याद्यांच्या सूक्ष्म तपासणीवर भर दिला.

'आत्मविश्वास हेच मोठे बळ; पैसे नसले तरी जिंकू!'

यावेळी निरीक्षक प्रतापराव सोनवणे यांनी कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवला. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांजवळ 'पैसे नसले' तरी 'प्रबळ आत्मविश्वास' आहे आणि तोच काँग्रेसला विजय मिळवून देईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. या विधानातून काँग्रेसने निवडणूक केवळ पैशाच्या बळावर नव्हे, तर आत्मविश्वासाच्या जोरावर लढण्याचा निर्धार व्यक्त केला. मेळाव्यात चिनोदा येथील उपसरपंच राजेंद्र पाटील आणि तळोदा येथील शिंदे सेनेचे अनिल पवार यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. या पक्षप्रवेशांनी तळोदा तालुक्यात काँग्रेसचे बळ वाढल्याचे स्पष्ट झाले. याशिवाय, बैठकीत 'आकाची माणसं येत आहेत आणि सांगत आहेत की आपण वाटाघाटी करू' असा एक सूचक उल्लेखही करण्यात आला, ज्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप नाईक, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुहास नाईक, देमोगरा एज्युकेशन सोसायटी नंदुरबारचे राजेंद्र गावीत, तळोदा तालुका काँग्रेस अध्यक्ष नाथा पावरा, तळोदा तालुका माजी अध्यक्ष रोहिदास पाडवी,निरक्षक विधानसभा प्रकाशराव सोनवणे, सुरेश इंद्रजित,दीपक मोरे, माजी उपसभापती,देवा चौधरी, नंदुरबार जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती नरहर ठाकरे, दिवाकर पवार,अर्जुन वळवी,चंदर पवार,प्रताप पाडवी,इम्रान शेख, तळोदा पंचायत समितीच्या माजी सभापती लताबाई वळवी, सोनी पाडवी, सुमन वळवी, योगिताताई वळवी वसंतीताई ठाकरे,सचिन राहासे,भगवान माळी,बापू कलाल, दिलीप चौधरी गणेशभाई पटेल सह वरिष्ठ पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या मेळाव्यामुळे तळोदा काँग्रेसमध्ये आगामी निवडणुकांसाठी एक नवी ऊर्जा आणि उत्साह संचारल्याचे चित्र आहे.

डॉ.संपदा आत्महत्येस कारणीभूत दोषींवर कठोर कारवाई करा

आय.एम.चे राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
अंबाजोगाई । प्रतिनिधी

मयत डॉ.संपदा मुंडे आत्महत्येस कारणीभूत दोषींवर कठोर कारवाई करा अशी मागणी आय.एम.चे राज्य पदाधिकारी डॉ.राजेश इंगोले यांनी केली आहे. या संदर्भात अंबाजोगाईत डॉक्टर्स बांधवांकडून एक निवेदन ही देण्यात आले आहे.बीडच्या वडवणी तालुक्यातील कवडगाव येथील रहिवासी असलेल्या व सध्या फलटण ग्रामीण वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या डॉ.संपदा मुंडे यांनी पोलीस प्रशासनातील अधिकारी, राजकीय पुढारी व आरोग्य सेवेतील वरिष्ठ अधिकारी यांच्या शारीरिक व मानसिक जाचास कंटाळून हातावर सुसाईड नोट लिहून आत्महत्या केली होती. या प्रकरणाचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत

आहेत. भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन व राजकीय पुढारी यांच्यातील अभद्र युतीमुळे सर्वसामान्य जनतेस व प्रामाणिक अधिकाऱ्यांवर मरण्याची वेळ येत आहे. या प्रकरणी इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात येत आहे डॉ.संपदा मुंडे यांची आत्महत्या नसून प्रशासनाने केलेली हत्या आहे त्यामुळे डॉ.संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्यांची एसआयटी चौकशी करा. तसेच हा खटला फास्टट्रॅक कोर्टामध्ये चालून संबंधित प्रशासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन, राजकीय पुढार्यांवर त्वरित कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ राजेश इंगोले यांनी उपजिल्हाधिकारी कार्यालयात केली आहे. घडलेल्या प्रकारामुळे कार्यतत्पर वैद्यकीय अधिकारी यांचे मानसिक खच्चीकरण झालेले असून सरकारने बघ्याची भूमिका न घेता दूषी असलेल्या या नराधमांवर त्वरित कायदेशीर कार्यवाही करावी व दोषींना शासन द्यावे अशी मागणी एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना केली आहे. सदरील आंदोलनात इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई, अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन तसेच मार्ड संघटना अंबाजोगाई सहभागी झाले होते. यावेळी डॉ.राजेश इंगोले, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.राहुल धाकडे डॉ.सुलभा पाटील, डॉ.विजय लाड, डॉ.बळीराम मुंडे, डॉ.सुनील जाधव, डॉ.इमरान शेख यांच्यासह स्वामी रामानंद तीर्थ रूग्णालयातील मार्टचे पदाधिकारी व इतर डॉक्टर्स उपस्थित होते.

३ व ४ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन

सह्याद्रीचा राखणदार
अहिल्यानगर । प्रतिनिधी

युवकांचा सर्वांगीण विकास, संस्कृती व परंपरेचे जतन, सुप्त गुणांना वाव देणे व राष्ट्रीय एकात्मता वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने दरवर्षी राष्ट्रीय व राज्यस्तरावर युवा महोत्सव आयोजित केला जातो. त्याअनुषंगाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने दि. ३ व ४ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर येथे जिल्हास्तर युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांनी दिली.महोत्सवादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार असून सांस्कृतिक विभागात लोकनृत्य, लोकगीत, कौशल्य विकास विभागात कथालेखन, चित्रकला, वक्तृत्व, कविता आदी स्पर्धा होतील. तसेच नवोपक्रम ट्रॅकमध्ये विज्ञान प्रदर्शनाचे आयोजनही करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये १५ ते २९ वयोगटातील युवक व युवतींना (१२ जानेवारी २०२६ रोजी वयाची गणना १५ ते २९ वर्षे अशी करण्यात येईल) सहभागी होण्याची संधी मिळेल. प्रत्येक स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळविणाऱ्या स्पर्धकांना रोख पारितोषिक व प्रमाणपत्र देण्यात येईल. तसेच विभागीय, राज्य व राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी होण्याची संधी मिळेल.युवा महोत्सवासाठी जिल्ह्यातील कृषी, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी, महिला मंडळे तसेच १५ ते २९ वयोगटातील युवक-युवतींनी https://docs.google.com/forms/d/e/1F-IpQLSdwZtISFhCe2tIj1MqFh5q3dXqPUXv4ttO73wbTGZIsxWcX-Q/closedform गुगल फॉर्म लिंकद्वारे ३१ ऑक्टोबर २०२५ पर्यंत सहभाग नोंदवावा, असे आवाहन श्री. खुरंगे यांनी केले आहे

सातपुडा परिसरात मुसळधार पावसाने हाहाकार-शेतकरी व व्यापारी दोघेही संकटात

दैनिक वादळ वार्ता
बोरद । मंगेश पाटील

सातपुड्यासह तळोदा तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने हाहाकार माजविला आहे. सलग पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत आहेत. काही ठिकाणी पूरपरिस्थिती निर्माण झाली असून पावसाने शेतकऱ्यांना अक्षरशः झोडपून काढले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला असून शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. तालुक्यातील शेतकरी वर्गाने मेहनतीने उभा केलेला कापूस, सोयाबीन, मका, तूर पिक पावसामुळे ओलाचिंब झाले आहे. अनेक ठिकाणी कापसाच्या बोंडात पाणी शिरल्याने उत्पादनावर परिणाम होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. तर सोयाबीन पिक कापून पडल्याने मातीमध्ये मिसळले आहे. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे.दरम्यान, तळोदा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात सुद्धा पावसाचा मोठा फटका बसला आहे. रविवार रोजी पहाटे झालेल्या मुसळधार पावसामुळे व्यापाऱ्यांनी खरेदी केलेला सोयाबीन व मका हा माल आवारात साठवलेला होता. मात्र, मुसळधार पावसामुळे संपूर्ण धान्य ओलाचिंब होऊन लाखोंचे नुकसान झाले आहे.सावरीया ट्रेडर्स, जगलीला फार्मर प्रोड्युसर कंपनी, के. एन. ट्रेडर्स, महेश कलाल यांसारख्या व्यापारी फर्म्सना लाखोंचे नुकसान सहन करावे लागले आहे. बाजार समितीच्या आवारात अजूनही चिखलाचे साम्राज्य असून व्यापारी व शेतकरी दोघेही हतबल झाले आहेत.



माझ्या शेतात सोयाबीन लागवड केली होती. हवामान विभागाने पावसाचा अंदाज वर्तवला होता. त्यामुळे लवकरात लवकर सोयाबीनची कापणी केली होती. दुसऱ्या दिवशी मळणी मशीनद्वारे सोयाबीन काढणार होतो. परंतु पहाटे मुसळधार पाऊस आल्याने सर्व सोयाबीन ओले होऊन मोठे नुकसान झाले. सुनील गोसावी, खरवड

यशोदा सीड्स ने केली धान उत्पादक शेतकऱ्यांची फसवणूक-किसान मोर्चाची पोलिस ठाण्यात तक्रार

दैनिक वादळ वार्ता
मुल । प्रतिनिधी

यशोदा सिड्स कंपनीच्या नोवा-१४५ वाणामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, या संदर्भात आज भारतीय जनता पार्टी किसान मोर्चा तर्फे पोलीस स्टेशन, मूल येथे अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली आहे

बंडू मधुकर गौरकार यांनी या वाणाविषयी तक्रार केली होती. कंपनीच्या जाहिरातीनुसार हे वाण १४५ ते १५० दिवसांत पूर्ण वाढते व कापणीयोग्य होते, असे सांगितले गेले होते. मात्र प्रत्यक्षात या वाणाच्या शेतीत ९० ते १०० दिवसांत काही धानाला फुलोरा येतो, तर ११० ते १२० दिवस उलटूनही अनेक ठिकाणी अजून फुलोरा आलेला नाही, असे आढळले आहे.

कृषी विभागाच्या पाहणी अहवालानुसार संबंधित बियाण्यात ३५ ते ४० टक्के भेसळ असल्याचे निष्पन्न झाले असून, त्यामुळे शेतकऱ्यांचे गंभीर आर्थिक नुकसान झाले आहे.

या तक्रारीची दखल घेत आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कृषी विभागास निर्देश दिले आहेत की संबंधित कंपनीविरुद्ध सखोल चौकशी करून योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. तसेच, किसान मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी आज मूल पोलीस ठाण्यात जाऊन रीतसर तक्रार देत कंपनीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

किसान मोर्चाने स्पष्ट केले की शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या यशोदा सीड्स कंपनीला सोडले जाणार नाही. शेतकऱ्यांचे नुकसान भरून न येईपर्यंत संघर्ष सुरूच राहील.

या प्रसंगी किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बंडू गौरकार, चंदू मारगोनवार, रवी चहारे, प्रमोद कळसकर पलींद्र सातपुते विजय गुरनुले, गुलशन लाकडे गुरुदास भंडारे तसेच पदाधिकारी व कार्यकर्ते शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपामध्ये 'महा संसद रत्न' डॉ.हिना गावित यांचे दमदार पुनरागमन!

प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात अक्कलकुवा धडगावसह शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

दैनिक वादळ वार्ता
नंदुरबार । दिपक गोसावी

भारतीय जनता पार्टीच्या माजी खासदार आणि धडाडीच्या युवा नेत्या 'महा संसद रत्न' डॉ. हिना विजयकुमार गावित यांनी २८ ऑक्टोबर २०२५ रोजी, अक्कलकुवा-धडगाव तालुक्यातील शेकडो प्रमुख पदाधिकाऱ्यांसह व कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत पुनश्च दमदार प्रवेश केला. मुंबई येथील भाजपच्या प्रमुख कार्यालयात प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात हा शानदार प्रवेश सोहळा पार पडला. डॉ. हिनाताई गावित यांच्या पुनरागमनामुळे नंदुरबार जिल्हा भाजपमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, यामुळे नंदुरबार जिल्हा भाजपची संघटन शक्ती वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. प्रवेश सोहळ्याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी माजी खासदार डॉ. हिना गावित यांचा स्कार्फ देऊन सत्कार केला. यावेळी महाराष्ट्राचे माजी आदिवासी विकास मंत्री तथा आमदार डॉ. विजयकुमार गावित आणि जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष डॉ. सुप्रिया गावित यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी डॉ. हिना गावितांना शुभेच्छा देताना, आपल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे नंदुरबार जिल्ह्यातील कार्य आणखी गतिमान होईल व शक्ती वाढीस लागेल, असा विश्वास व्यक्त केला. महत्त्वाच्या पदाधिकाऱ्यांचा प्रवेश डॉ. हिना गावित यांच्यासोबत एकनाथराव शिंदे गटाच्या शिवसेनेचे माजी जिल्हा परिषद सदस्य किरसिंग वसावे आणि प्रताप वळवी (अक्कलकुवा) तसेच सुभाष आप्पा पावरा (धडगाव) यांनी जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच आणि गाव पातळीवरील शेकडो कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश केला. याशिवाय, नंदुरबार जिल्हा परिषदेतील माजी

सभापती हेमलता शितोळे (शहादा), माजी जिल्हा परिषद सदस्य नितेश वळवी, प्रताप वसावे, निवृत्त अप्पर पोलीस अधीक्षक तथा माजी जिल्हा परिषद सदस्य रूपसिंग तडवी, हिरा पाडवी, महेश तवर यांचाही प्रवेश करणाऱ्यांमध्ये समावेश होता. 'कृतिशील कार्यकर्ता' म्हणून कार्य करणार: डॉ. हिना गावीत यांनी प्रवेश सोहळ्यानंतर मनोगत व्यक्त करताना सांगितले की, कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी एक वर्षापूर्वी अपक्ष उमेदवारी केली होती. मात्र, आता भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठांनी मला पुन्हा संधी दिली. त्यामुळे आजपासून मी भाजपाची कृतिशील कार्यकर्ता म्हणून कार्य करणार असून, नंदुरबार जिल्ह्यातील संघटन वाढीस लावण्याचे लक्ष राहणार आहे. या संधीबद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रवींद्र जी चव्हाण आणि त्यांचे मार्गदर्शक तथा नेते आमदार डॉ. विजयकुमार गावित यांचे आभार मानले.

विकासाभिमुख नेतृत्वाचे उदाहरण-२०१४ आणि २०१९ अशा सलग दोन लोकसभा निवडणुकीत दणदणीत विजय मिळवून खासदार बनलेल्या डॉ. हिना गावित यांनी आपल्या दहा वर्षांच्या कारकिर्दीत विकासाची गंगा अविरतपणे सुरू ठेवली आहे.

त्या नंदुरबार लोकसभा मतदारसंघातून निवडून आलेल्या पहिल्या महिला खासदार आहेत. युनोमध्ये प्रतिनिधित्व केलेल्या पहिल्या आदिवासी महिला खासदार आहेत. उत्कृष्ट संभाषण व वक्तृत्व कौशल्यामुळे त्यांना संसद रत्न हा सन्मान प्राप्त झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीसुद्धा त्यांच्या वक्तृत्वाचे अनेकदा कौतुक केले आहे.

स्वराज्य जनजागृती परिषदेचे पंधरा जिल्हाध्यक्ष जाहीर

संघटन तळागाळापर्यंत पोहोचवा-अजित देशमुख

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

लोकशिक्षण आणि लोकजागृती हा उद्देश समोर ठेवून स्वराज्य जनजागृती परिषद हे संघटन स्थापन करण्यात आले आहे. परिषदेच्या मराठवाडा आणि पुणे विभागातील तेरा जिल्ह्यांच्या त्याचप्रमाणे अकोला, वाशिम, अहिल्यानगर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांच्या मेळाव्यानंतर ड. अजित एम. देशमुख यांनी ही घोषणा केली आहे.परिषदेचे कामकाज व्यक्तीला नव्हे तर भ्रष्ट व्यवस्थेला विरोध या तत्त्वाने चालेल. त्याचप्रमाणे लोकशिक्षण आणि लोकजागृती हा प्रमुख उद्देश असेल. याशिवाय आज पर्यंत चालत आलेले भ्रष्टाचाराला विरोध हे काम देखील तेवढ्याच प्रगल्भतेने चालू ठेवण्यात येणार आहे. सोळा जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी प्रत्यक्ष संवाद साधल्यानंतर आणि मेळावे आणि बैठका घेतल्यानंतर सक्रिय कार्यकर्त्याची निवड जिल्हाध्यक्ष म्हणून करण्यात आली आहे. परिषदेचे कामकाज वाढवण्यासाठी जिल्हाध्यक्षांना एक आचारसंहिता कळविण्यात आली आहे. पद्धतशीरपणे समाजातील सर्व घटकांना परिषदेमध्ये सहभागी करून चारित्र्यसंपन्न कार्यकर्त्यांना कामाला लावण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. निवड झालेल्या पंधरा जिल्हा अध्यक्षांची नावे पुढे दिली असून जिल्ह्याचे नाव कंसात दिले आहे. इंजिनीयर बालाजी जळबाजी गायकवाड (बीड), प्रा. ज्ञानेश्वर हरिकिसन गोराडे (छत्रपती संभाजीनगर), धनाजी भीमराव कुरुंद (धाराशिव), प्रा. डॉ. भागवत अंकुश कराडकर (जालना), प्रा. तात्यासाहेब जगन्नाथ नंदवे (लातूर), संपादक बालाजी आबाजी भुसारे (परभणी), सुधाकर बळीराम संगेकर (हिंगोली), ड. महेश कुंडलिक डुके (पुणे ग्रामीण), विक्रम गणपतराव बर्गे (सातारा), उमेश महादेव भोसले (सोलापूर), धैर्यशील आनंदराव पवार (सांगली), पवन सारंगधर कुमकर (अकोला),अविनाश सखाराम पसारकर (वाशिम) आणि टिळक गोपीनाथ बोस (अहिल्यानगर), राजेंद्र गणपती लाड (पुणे शहर) या चौदा जिल्ह्यांचा यात समावेश आहे.स्वातंत्र्यानंतर खऱ्या अर्थाने जनतेला स्वातंत्र्य मिळाले नाही. त्यामुळे लोकशिक्षण आणि लोकजागृतीची गरज आहे. शासन आणि प्रशासनाला प्रश्न विचारणारा नागरिक तयार होणे आवश्यक आहे. परिषदेमार्फत शेतकरी, विद्यार्थी, नागरिक या सर्वांसाठी त्याचप्रमाणे शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावयाचे आहेत. त्याचप्रमाणे कार्यकर्त्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करून कार्यकर्ता उभा करण्यासाठी मेहनत घेतली जाणार आहे. जिल्हाध्यक्षांनी आता पारदर्शकतेने कामाला लागावे. परिषदेचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणि जनतेची कामे नडु नयेत, यासाठी सक्रिय रहावे. जनतेला मार्गदर्शन करावे. आपल्या कामाचा अहवाल परिषदेच्या आदेशाप्रमाणे देत रहावे, असे आदेश देण्यात आले असून परिषदेचे अध्यक्ष ड. अजित एम. देशमुख यांनी आणि विश्वस्त मंडळाने नवनियुक्त पंधरा जिल्हा अध्यक्षांचे अभिनंदन केले आहे. परिषदेचे उपाध्यक्ष संदीप जगताप (सातारा), परिषदेचे सचिव तुषार अच्युतराव पाटील (कुर्ला), सहसचिव अरुण मोहन बोबडे (धाराशिव), कोषाध्यक्ष शिवाजी बबन खेडकर (पुणे) सदस्य विष्णू भगवान ढवळे (छत्रपती संभाजीनगर) आणि गोवर्धन विठ्ठलराव मस्के (बीड) यांच्या सह चर्चा करून हा निर्णय घेण्यात आला आहे. स्वराज्य जनजागृती परिषद नागरिकांना मार्गदर्शन करीत लहान लहान प्रश्न सोडवण्यासाठी त्यांना सक्षम करण्यासाठी प्रयत्न करेल. सजग नागरिक निर्मितीसाठी झटने आता गरजेचे असल्याने या सर्व बाबी आम्ही प्रामुख्याने जनतेसमोर घेऊन येऊ, असे याप्रसंगी ड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

राजरत्न सरवदे एन.के.आप्पा सरवदे यांचे नातु प्रभाग क्रमांक ११ मधून निवडणूक लढवण्यास इच्छुक

दैनिक वादळ वार्ता
परळी । प्रतिनिधी

राजरत्न विजयकुमार सरवदे उच्चशिक्षीत तरुण सामाजिक भान असणारे उमेदवार तसेच सामाजिक प्रश्ना विषयी रस्त्यावर उतरणारे कार्यकर्ते आहेत त्यांना फार मोठी सामाजिक व राजकीय पार्श्वभुमी आहे.त्यांचे आजोबा दिवंगत एन.के.आप्पा सरवदे यांनी अनेक सामाजिक, राजकीय, गायराण धारक, धार्मिक कार्यक्रमात सहभाग नोंदविलेला आहे. त्यांनी संत चोखामेळा संस्था तळ परळी येथील जागा ताब्यात घेऊन तेथे मंदीर बांधले त्याच बरोबर पंचशील नगर येथील विहारची जागा आरक्षीत करण्यासाठी प्रयत्न केले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर शॉपींग सेंटर शिवाजी चौक या शॉपींग सेंटरला नाव देण्यासाठी अनेक अंदोलनी केली डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा रेल्वे स्टेशन परळी वै. येथील जागा अरक्षीत करण्यासाठी रेल्वे प्रशशान विरुध्द आनेक अंदोलनी केली त्यांचे चुलते सभृतीशेश राजकुमार सरवदे विद्यापीठ दंगलीत चाकु लागल्यामुळे तीन वर्षानंतर शहीद झाले त्यांच्या अजोबानी आर्चय टाकळी, वान टकाळी ,दौनापुर साबला कवडगाव, घौडा कौडगांव येथील गायरान धारकांना ७ /१२ मिळविण्यासाठी अनेक अंदोलने करुन शेवटी ७/१२ मिळुवन दिल्या रजरत्न विजयकुमार सरवदे यांच्या आजोबामुळे पंचशील नगर येथील रस्त्याचे कामे पाण्याची सोय येथील वस्तीत पाण्याची सोय केली पंचशील नगर मध्ये डॉ. बाबासाहेब आआंबेडकर यांची जयंती १९८६ ला निघावी म्हणुन प्रयत्न केले.त्यांनी भारीप बहुजन महा संघ ॲड. बाळासाहेब आंबेडकर भरतीय बौध्द महासभा यांच्या माध्यमातुन दीवंगत उपरे काका, प्रा. माधव मोरे, एस. के. जोगदंड सर, यांच्या माध्यमातुन आनेक सामाजिक धार्मिक बौध्द श्रामनेर शब्बीर अयोजीत केले त्यांनी व ओबीसी बौध्द विद्यार्थ्यांच्या कॉलरशीप साठी अनेक मोर्च काढले त्यांनी रिपाई सदैव पर्यंत केले महिलासाठी मनुस्मृती दहन दिन आनेक साजरी केले त्यांच्या निवासस्थानी ॲड. बाळासाहेब आंबेडकर महाउपासिका मिराताई आंबेडकर राज्य मा. मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण राज्याचे मा. उपमुख्यमंत्री दंवगत गोपीनाथराव मुंडे विधानसभेच्या उपसभापती श्रीमती निलमताई गौरे भेटी दिल्या आहेत प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी ही राजरत्न विजयकुमार सरवदे यांच्या निवास स्थानी यांनी भेटी दिल्या आहेत. आनुसुचित जातीच्या नगरसेवक पदाच्या जागेसाठी निवडणुक लढावु इच्छीत आहे.

छत्रपती साखर कारखान्याचा १२ वा गळीत हंगामास सुरुवात

माजलगाव । दर्शन डोंगरे

माजलगाव तालुक्यातील छत्रपती सहकारी साखर कारखाना लि., सोनाजीनगर याचा २०२५-२६ चा बाराव्या गळीत हंगामाचा शुभारंभ मंगळवारी कारखान्याचे चेअरमन मा. आ. बाजीराव (भाऊ) जगताप व व्हा. चेअरमन मोहनराव जगताप तसेच शेतकऱ्यांच्या शुभहस्ते गव्हाणीत मोळी टाकून पार पडला.

यावेळी बोलताना चेअरमन जगताप म्हणाले की, छत्रपती साखर कारखाना हा नेहमीच शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करणारा कारखानाआहे. इतर कारखान्यांपेक्षा आम्ही ऊसाला अधिकचा दिलेला आहे. यंदा पावसाचे प्रमाण चांगले असल्याने ऊस लागवड खुप मोठ्या प्रमाणात झाली आहे. छत्रपती कारखाना हा एकाही शेतकऱ्याचा ऊस शेतात शिल्लक ठेवणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस छत्रपती कारखान्याकडेच गाळपासाठी आणावा. व्हा. चेअरमन मोहनराव जगताप यांनी सांगितले की, गेल्या अकरा हंगामांप्रमाणे यंदाही छत्रपती कारखाना शेतकऱ्यांना योग्य भाव देणार. शेतकऱ्यांचा विश्वास आमची ताकद आहे. तसेच शेतकऱ्यांच्या हक्कासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाला कारखान्याचे संचालक, सभासद, ऊस उत्पादक शेतकरी, कर्मचारी, ऊसतोड कामगार, मुकादम, वाहतूक ठेकेदार, पत्रकार, नेते मंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अक्कलकुवा तालुक्यात 'दिवाळी'नंतर अवकाळी पावसाचा हाहाकार; कापूस, ज्वारीसह खळ्यातील धान्य सडले!

शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला,मोठे आर्थिक संकट

दैनिक वादळ वार्ता
मोलग । रविंद्र वळवी

दिवाळीचा सण संपल्यानंतर लगेचच अक्कलकुवा तालुक्यात शनिवार, रविवार आणि सोमवारी रात्री झालेल्या मुसळधार अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. काढणीला आलेली पिके आणि मळणीसाठी खळ्यात साठवलेले धान्य पूर्णपणे भिजल्याने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. या नुकसानीमुळे शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून, तातडीने पंचनामे करून आर्थिक भरपाई देण्याची मागणी त्यांनी केली आहे.

अक्कलकुवा, खापर आणि सातपुड्याच्या डोंगरदऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात पावसाच्या सरी कोसळल्याने नदी-नाल्यांना पूर आला. काढणीला आलेला कापूस पूर्णपणे ओला झाला. यामुळे कापसाची प्रत (क्वालिटी) मोठ्या प्रमाणावर खराब झाली असून, अनेक बोंडे सडली आहेत.

शेतातील उभी तसेच कापणी करून मळणीसाठी खळ्यात ठेवलेली ज्वारी, मका, सोयाबीन, उडीद, मोर, बंटी, भगर या धान्याला ओलाव्यामुळे जागीच कोंब (अंकुर) फुटले आहेत. उभ्या पिकांमधील ज्वारी काळी पडली आहे. अनेक ठिकाणी मका, ज्वारी, सोयाबीन आदी पिके जमीनदोस्त झाली आहेत. शेतजमिनीत पाणी साचल्यामुळे उभे पीक कुजून गेले आहे.उत्पन्नाच्या प्रतीक्षेत असतानाच अवकाळी पावसाने मोठा फटका दिल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. झालेल्या नुकसानीमुळे ते आर्थिक संकटाच्या उंबरठ्यावर उभे आहेत.शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे त्वरित लक्ष देण्याची विनंती केली आहे. या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना आर्थिक नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

कंधार आणि लोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी निरीक्षकपदी मोहनअण्णा हंबर्डे यांची नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
कंधार । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज संस्था निवडणुकीच्या अनुषंगाने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्यावतीने कंधार आणि लोहा तालुक्यासाठी निरीक्षक म्हणून दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार मोहनअण्णा हंबर्डे नेताजीराव भोसले व डॉ.आशिया कौसर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीच्या अनुषंगाने कंधार शहरातील आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे कार्यालय येथे शुक्रवार, दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी स.१०.०० वाजता इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येणार आहेत. व दुपारी १.०० वाजता आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे लोहा शहरातील बस स्थानकाजवळील संपर्क कार्यालयात इच्छुकांच्या मुलाखती माजी आ.मोहनअण्णा हंबर्डे, नेताजीराव भोसले डॉ.आशिया कौसर यांच्या उपस्थितीत पार पडणार आहेत.

जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपरिषद निवडणुक लढू इच्छुक पदाधिकाऱ्यांनी वरील ठिकाणी उपस्थित राहून मुलाखती देण्याचे आव्हान राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कंधार तालुकाध्यक्ष मनोहरराव भोसीकर व लोहा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष छत्रपती स्वामी यांनी केले आहे.

पिशोर परिसरात पावसामुळे शेतकऱ्यांचे दिवाळीत दिवाळा निघण्याचे संकट

दैनिक वादळ वार्ता
पिशोर । जावेद शेख

पिशोर व परिसरात मागील दोन तीन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या परतीच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या दिवाळीच्या आनंदावर पाणी फिरले आहे. ऐन सणासुदीच्या दिवसातच पावसाने कष्टाला पाण्यात मिळवल्याने शेतकरी चिंतेत आहेत.यापूर्वी तीन आठवड्यांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमध्ये घाटमाथा व नदीकिनारील मोठ्या प्रमाणात पिके वाहून गेली होती. आता परतीच्या पावसाने उरलेली पिके विशेषतः मका, कापूस, टोमॅटो व फळभाज्या खराब होण्याच्या मार्गावर आहेत. दरम्यान, शासनाकडून अनुदान अद्याप शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नसल्याने त्यांच्या अंधारलेल्या दिवाळीत आणखी अंधार वाढला आहे. शेतकऱ्यांचा संताप उफाळला असून व्यापारी वर्गालाही याचा फटका बसत आहे.या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी तात्काळ मदत, वाटप करण्याची मागणी शासनाकडे केली असून, शेतकऱ्यांची दिवाळी थोडी का होइना गोड व्हावी यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी जोरदार मागणी होत आहे.

खर्डे-कनाहा वंशीय स्नेहसंमेलन: एकता आणि आपुलकीचा सोहळा रोषमाळ येथे उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
मोलग । रविंद्र वळवी

नात्यांची वीण घट्ट करणारा आणि एकोप्याचा संदेश देणारा खर्डे-कनाहा वंशीय पारिवारिक स्नेहसंमेलनाचा ऐतिहासिक सोहळा धडगाव तालुक्यातील निसर्गरम्य रोषमाळ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विविध राज्यांत विस्थापित झालेल्या या परिवारातील सदस्यांनी एकत्र येऊन कौटुंबिक स्नेह जपत, आपल्या समृद्ध वारशाचे स्मरण केले.या भव्य स्नेहसंमेलनाची सुरुवात अत्यंत भक्तिमय वातावरणात झाली. आदिवासी कुलदैवत देवमोगरा माता, राणीकाजल माता, आई गिरहोण माता आणि वंशपुरुषांच्या प्रतिमेला दीपप्रज्वलन व पुष्पांजली अर्पण करून पारंपरिक पद्धतीने कार्यक्रमाचा श्रीगणेशा झाला. गोसा पेंटर यांच्या स्वरचित स्वागत कवितेने उपस्थितांना भारावून टाकले.

धडगाव नगरपरीषदेचे अध्यक्ष धनसिंग खर्डे यांनी प्रास्ताविक मांडून स्नेहसंमेलनाचा उद्देश स्पष्ट केला. पावरा समाजाचे पहिले णझडउ उत्तीर्ण आणि सध्या गांधीनगर येथे उपायुक्तपदी असलेले अजय खर्डे यांनी या संमेलनाचे अध्यक्षपद भूषवले.

आपल्या मनोगतात अजय खर्डे यांनी पूर्वजांनी जपलेल्या कष्ट, प्रामाणिकपणा आणि एकतेच्या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, आपला वंश विविध क्षेत्रांत नाव कमवत आहे, पण आपण सगळे एकाच नाळीचे आहोत, हाच अभिमानाचा विषय आहे. या स्नेहसंमेलनातून आपण फक्त मनोरंजन न करता, एकता, आपुलकी आणि पुढच्या पिढीला प्रेरणा देणारा संदेश देऊ या.

या सोहळ्याचे खास आकर्षण ठरली ती आडगाव येथील खर्डे परिवाराची सांस्कृतिक रॅली. पारंपारीक वाद्ये आणि बासरीच्या सुरांनी वातावरणात एक वेगळीच रंगत आणली. गुजरात, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि राजस्थान या चार राज्यांतून आलेल्या खर्डे-कनाहा परिवाराच्या हजारो सदस्यांनी यावेळी मोठ्या संख्येने हजेरी लावली. परस्पर संवाद आणि आनंदाच्या वातावरणात हा भावबंध वृद्धिंगत करणारा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजिव खर्डे, प्रविण खर्डे, संजय पावरा यांनी केले, तर आभार धनसिंग खर्डे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी धडगाव नगरपरिषदेचे अध्यक्ष धनसिंग खर्डे, हारसिंग खर्डे, मनोज खर्डे यांच्या नेतृत्वात रोषमाळ येथील सर्व खर्डे-कनासे बंधू-भगिनी आणि युवा-महिला वर्गाने मोलाचे सहकार्य केले. एक वंश - एक परिवार या भावनेने स्नेहभोजनासह सोहळ्याची उत्साहात सांगता झाली.

पुढील वर्षी हे भव्य स्नेहसंमेलन मध्यप्रदेशातील आलिराजपुर येथील बखतगढ येथे योजित करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला, अशी माहिती श्री बादशा कनासे यांनी दिली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077